# बीएसयुपी घरकुलात नांदेड ठरतेय नंबर वन

## अडथळयांची मालिका पार करत घरांचे हस्तांतरण

## लोकसहभागाबरोबरच जाणिव जागृतीवर भर

झोपडपट्टी व मागास भागातील कुटूंबाचे राहणीमान उंचावण्यासाठी केंद्र, राज्य सरकार तसेच महापालिकेच्या संयुक्त निधीतुन सुरू असलेल्या बीएसयुपी योजनेतील घरकुल उभारणी व पायाभुत सुविधांच्या कामात नांदेडची वाटचाल नंबर वनच्या दिशेने होते आहे. लाभार्थ्यांची कच्ची घरे पाडुन त्याच ठिकाणी त्यांना पक्की घरे बांधुन भविष्यकाळातील पेचप्रसंग टाळणे तसेच लोकसहभागासाठी जाणीव जागृती निर्माण करणे, या दोन मुख्य बाबींमुळे नांदेडमध्ये केलेल्या प्रकल्पाच्या कामाची देशस्तरावर ठळकपणे नोंद घेण्यात आली आहे.

राज्यातील अन्य महापालिकेच्या क्षेत्रातही बीएसयुपीची कामे सुरू आहेत. परंतु तेथील गती मात्र नांदेडच्या तुलनेत कमी आहे. नागपुर मनपा अंतर्गत १६ हजार १८६ घरांपैकी केवळ १९० घरे पूर्ण झाली. नाशिकमध्ये १६ हजारापैकी २हजार ९३४ घरे पूर्ण झाली. मोठी लोकसंख्या असलेल्या नवी मुंबईत ६६ हजार ६९३ पैकी ६ हजार ५०७ तर पुणे शहरात ५७ हजार ६५६ पैकी १ हजार ६३९ घरे हस्तांतरीत झाली आहेत. दुसरीकडे नांदेड शहराला पहिल्या टप्प्यात मंजुर झालेल्या २१ हजार १७१ घरांपैकी ५ हजार ३५४ घरे बांधुन पूर्ण झाली असुन तेथे वास्तव्यासाठी लाभार्थी स्थलांतरीत देखील झाले आहेत. आणखी ३ हजार ३१८ घरांचे आरेखन (मार्कआऊट) देण्यात आले असुन यातील १ हजार २०६ घरांच्या छताचे काम अंतिम टप्प्यात आहे. डिसेंबर-२०११ अखेर १० हजाराहुन अधिक घरांचे काम पूर्ण होईल असा या विभागाचा दावा आहे.

एनटीसी भागातील घरकुलाचा प्रस्ताव गुरूद्वारा बोर्डाकडून हस्तांतरीत करावयाच्या जागेअभावी रखडला आहे. या ठिकाणी ५ हजार १३६ घरांची उभारणी केली जाणार आहे. मनपात नव्याने समाविष्ठ झालेल्या तरोडा भागात २ हजार लाभार्थ्यांची यादी मंजुर असुन यातील ५०० घरांचे आरेखन देण्यात आले आहे. मिल्लतनगर भागातील ८०० घरांपैकी १०० घरांचे आरेखन देण्यात आले आहेत. तीन मजली इमारतीचा उत्कृष्ट नमुना केलेल्या श्रावस्ती नगरात ४३५ पैकी ३०० घरे पुर्ण झाली आहेत. सांगवीतील शहिद गौतमनगरातही हा प्रयोग यशस्वी होत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरात दुमजली इमारतीही लाभार्थ्यांना हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

कधी ठेकेदाराचे असहकार्य तर कधी लाभार्थ्यांच्या पर्यायी जागेविना निर्माण झालेला पेच असे अनेक अडथळे या प्रकल्पाला येत असतात. परंतु लाभार्थ्यांची संवाद साधून त्यांच्यात घरकुलाविषयी जाणिवेची भावना निर्माण केल्याने हा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करण्यात मनपाला यश आले. लाभार्थ्यांना राहण्यासाठी केवळ उत्कृष्ट पध्दतीचे घरेच नव्हे तर स्वयंपाक गृह, स्वच्छतागृह, शौचालय, वीज, मलनिस्सारण तसेच नळ जोडणी आणि सिमेंट रस्ते या पायाभुत सुविधादेखील योजने अंतर्गत पुरविल्या जात आहेत. कधीकाळी अस्वच्छतेच्या साम्राज्यात आरोग्याशी संघर्ष करणाऱ्या लाभार्थ्यांना आता स्वच्छतेची महती पटत असुन रस्ते, घर व परिसराच्या स्वच्छतेची जाणिव त्यांच्यामध्ये रूजविण्यासाठी मनपा प्रोत्साहीत करीत आहे.

## बँकांचा निरूत्साह, मनपाचा दिलासा

हातावर पोट असणाऱ्या लाभार्थ्यांना लोकवाट्याची १० ते १२ टक्के रक्कम एकाच वेळी भरणे शक्य होत नसल्याने ती टप्प्या-टप्प्याने घेण्याचे धोरण नांदेड मनपाने स्विकारले आहे. यामध्ये आर्थिक अडचणी येणाऱ्या लाभार्थ्यांनी बँकेकडुन कर्ज घेण्याचा एक पर्याय समोर होता. परंतु तेथे गहाण ठेवायला जायचे तर आपल्याकडे काहीच नाही आणि परतफेडीची हमी घेणारा जामीनदार मिळत नाही, अशा दुहेरी कैचीत लाभार्थी अडकुन आहेत. सदर लाभार्थ्यांना नांदेड मनपाने आता मोठा दिलासा दिला आहे. लोकवाट्याची ५० टक्केहुन अधिक रक्कम भरली असल्यास किंवा लाभार्थ्यांनी स्वत:च्या घरासाठी श्रममुल्याचा मोबदला प्रदान केला तर उर्वरीत रक्कम लाभार्थ्यांच्या नव्या घरकुलावर बोजा टाकुन मनपा

महसुली अधिनियमाप्रमाणे वसुल करेल. परंतु लाभार्थ्यांकडुन लोकवाट्याचे पुर्ण पैसे जमा झाले नसल्याचे कारण पुढे करून घरांचे हस्तांतरण थांबविण्यात येणार नाही.

## स्थलांतराऐवजी त्याच ठिकाणी मजबुत पुनर्वसन

झोपडपट्टी निर्मुलनासाठी ही योजना राबविणाऱ्या पुण्यासारख्या अनेक शहराने शहराबाहेर स्वतंत्र जमिन संपादीत करून तेथे घरे उभारण्याचा पायंडा राबविला. गैरसोयीच्या जागेवर घरे उभारल्याचा मुद्दा पुढे करून अनेक लाभार्थी तेथे राहायला जाण्यासाठी लवकर तयार होत नाहीत. त्यामुळे भुसंपादनापासुन प्रकल्पाच्या उभारणीसाठी केलेला खर्च तसेच झोपडपट्टी निर्मुलनाबाबत प्रश्नचिन्ह उभे राहते. नांदेड शहरात हा प्रकल्प राबवितांना नव्या जागेच्या निवडी ऐवजी लाभार्थ्याच्या पुर्वीच्या कच्च्या घरांच्या ठिकाणी बीएसयुपीची घरे बांधण्यास प्राधान्य देण्यात आल्याने भुसंपादनाचा खर्च वाचला. आपल्याच जागेत पक्के घरे होत असल्याने लाभार्थ्यांमध्ये त्याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आणि झोपडपट्टी निवारणाच्या कामाला पाठबळ मिळाले. झोपडपट्टी निर्मुलनाची मुळात हीच खरी संकल्पना मानली गेली पाहिजे. प्रकल्पासाठी लाभार्थ्यांना हटवणे, काम वेगात पुर्ण करणे, तसेच बांधकाम साहित्यावर नियंत्रण ठेवणे या तीन बाबी शक्य होत नसल्याने नवी जागा संपादित करण्याचा पायंडा काही शहरांनी राबवला आहे.

## सामाजिक परिवर्तन अन् समतेची नांदी

नांदेडचे मनपा आयुक्त डॉ.निपुण विनायक यांनी शहरामध्ये गेल्या वर्षभरापासून स्वच्छतेची चळवळ उभी करण्यासाठी विशेष लक्ष पुरविले आहे. त्यामुळे झोपडपट्टीतुन बीएसयुपीच्या घरात वास्तव्याला गेलेल्या लाभार्थ्यांच्या जीवनातही मोठा बदल झालेला दिसुन येत आहे. अस्वच्छता आणि दारिद्र्याशी दोन हात करणाऱ्या कुटूंबीयांना आता घरातच शौचालयाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे उघड्यावर शौचाला जाणे बंद झाले आहे. नळाची जोडणी घरापर्यंत असल्याने सार्वजनिक नळावर रांगेत उभे राहण्याची गरज भासत नाही. चिमणीच्या दिव्याने प्रकाशाची उघडझाप करणारे घर आता विजेच्या दिव्याने उजळुन निघाले आहे. चिखलात रूतणाऱ्या पायाला आता मातीचाही स्पर्श होणे दुर्मीळ झाले आहे. पडद्याच्या आडोशाला स्वच्छता गृहाचा वापर करणाऱ्यांना आता दारे-खिडक्यांसह स्वतंत्र स्वच्छतागृह मिळाले आहे. हे सर्व वैभव पाहुन मळके किंवा फाटके कपडे घातल्यास अथवा हात-पाय अस्वच्छ ठेवल्यास लाभार्थ्यांनाच आता स्वत:बद्दल खजीलपणा वाटत आहे. बीएसयुपी घरकुलाने लाभार्थ्यांमध्ये केवळ सामाजिक परिवर्तनाची किमया साधली नाही तर उच्चभ्रु वसाहतीप्रमाणे घराची रचना करून त्यांच्यात समतेची नांदीही जोपासली आहे.

**गोविंद करवा,**
**जनसंपर्क अधिकारी,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.**